महाराष्ट्र विधानपरिषद

दिवसाच्या कामकाजाचा क्रम

मंगळवार, दिनांक २६ जुलै, २०१६

(सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -

(सोमवार, दिनांक २५ जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — (अनुक्रमांक १ ते ६) -

(१) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे,** सर्वश्री.संजय दत्त, रामहरी रुपनवर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ज्येष्ठांच्या वाढत्या वयामुळे आलेल्या दुर्बलतेचा अनेकजण गैरफायदा घेत असणे, रस्त्यावरील लुटमार तसेच स्वतःच्या घरातही त्यांना कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागणे, अगदी स्वत:च्या मुलांसोबत राहतानाही संपत्ती नावावर करुन देण्यासाठी त्यांना धमकाविण्यात येणे, वेळेवर जेवायला न देणे, आरोग्याची काळजी न घेणे, टोचून , शिवराळ भाषेत बोलणे, वेळप्रसंगी मुले, सुनांकडून मारहाण आदि प्रश्नांना सामोरे जावे लागणे, यासाठी ज्येष्ठ नागरिक पोलिस ठाण्यात धाव घेत असणे परंतु तेथेही पोलिस कर्मचा-यांकडून त्यांना चुकीची वागणूक मिळणे, अनेकांना तुम्ही आमच्या हद्दीत राहत नाही, असे पोलीसांनी उत्तर देऊन परिसरातील दोन — तीन पोलिस ठाण्यांमध्ये त्यांना फेरे मारायला लावणे, पोलिस आयुक्तालयात ज्येष्ठांसाठी हेल्पलाईन सुरु केलेली असूनही त्या माध्यमातूनही ज्येष्ठांचे प्रश्न न सुटणे, या हेल्पलाईनवर महिन्याला सुमारे ६० ते ७० तक्रारी येणे, परंतु त्यातील काही समस्या सोडविण्यात पोलिसांना मर्यादा येणे, पोलिस प्रशासनावरील कामाचा वाढता ताण, यामुळे ज्येष्ठांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होणे, परिणामी ज्येष्ठांमध्ये निर्माण झालेले भितीचे व दहशतीचे वातावरण, याकरिता शासनाने विविध सोसायटयांमध्ये युवक, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते आदिंची संघटना स्थापन करुन ज्येष्ठांच्या सुरक्षिततेची जबाबदारी त्यांना वाटून देऊन या कार्यात त्यांना सहभागी करुन घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. जनार्दन चांदूरकर,** प्रा. जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त, रामहरी रुपनवर, जगन्नाथ शिंदे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबई विमानतळालगत असलेल्या झोपड्यांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी घेतलेला असणे, एक

वर्षानंतर दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्र्यासोबत झालेल्या आढावा बैठकीत येथील पात्र झोपड्यांचे प्रथम १०० एकर जागेवर पुनर्वसन करण्यात येईल असे सांगण्यात आलेले असणे, मात्र या बैठकीत झोपडीधारकांचे पुनर्वसन कोठे करणार ती नेमकी जागा सांगण्यात आलेली नसणे, त्यानंतर लगेच दिनांक ४ मे, २०१६ रोजी झोपडीधारकांना सर्वेक्षणासाठी नोटीस पाठविण्यात आलेली असणे, या नोटीसमुळे रहिवाशांमध्ये संभ्रम निर्माण झालेला असणे, त्यांना पुनर्वसनासाठीची शंभर एकर जागा कोणती हा प्रश्न भेडसावत असणे, पुनर्वसन करण्यात येणारी जागा दाखवा म्हणून मुंबई विमानतळ झोपडपट्टी रहिवाशी संस्थेने मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन दिलेले असणे, याशिवाय प्रशासनाशी पत्रव्यवहार केलेला असणे, परंतु शासन प्रशासनाने उत्तर देण्याबाबत केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील झोपडीधारकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व असुरक्षिततेची भावना, त्यामुळे येथील झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी जागा निश्चित करण्याची शासनाने करावयाची तातडीची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(३) **प्रा. अनिल सोले,** सर्वश्री. गिरीशचंद्र व्यास, नागो गाणार, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील अपंग समावेशित शिक्षण योजना प्राथमिकस्तर या योजनेतून स्थानिक स्वराज्य शिक्षण संस्थामध्ये सामावून घेतलेल्या शिक्षकांचे वेतन, संरक्षण, सेवासमाप्त वेतन न मिळणे, त्यामुळे पुणे, कोल्हापूर, नागपूर विभागातील समावेशित शिक्षक वंचित असणे, त्याबाबत मा.उच्च न्यायालयात मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल केल्या जाणे, सदर याचिकेत लाभ देण्याचा निर्णय होऊनही त्यावर अद्यापही शालेय शिक्षण विभागाकडून कार्यवाही न होणे, त्यामुळे पात्र अपंग समावेशित शिक्षक वंचित असणे, त्यामुळे लोकप्रतिनिधी या नात्याने शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक २० जून, २०१५ रोजी लेखी पत्र देण्यात येऊनही न झालेली कार्यवाही, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने अपंग समावेशित शिक्षकांना, त्यांचा लाभ तातडीने देण्यासंबधी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री. हेमंत टकले,** किरण पावसकर, नरेंद्र पाटील, आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.ख्वाजा बेग, अनिल भोसले, गुरुमुख जगवानी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बोरिवली (पूर्व) मुंबई येथील सीटीएस क्रमांक २०८/२१७/२१८/ मौजे मागाठाणे येथील देवीपाडा गलिच्छवस्ती झोपडपट्टी योजनेअंतर्गत (एसआरडी) विकासक श्री. सद्गुरु एंटरप्रायजेस यांनी सदरहू भूखंडावर २९९ झोपडीधारक व २७ अनिवासी गाळे दाखवून त्यापैकी १२४ व १७५

अपात्र झोपडीधारकांचे खोटे पुरावे सादर करुन शासनाची फसवणूक केल्याचे उघडकीस येणे, तसेच वाटप करण्यात आलेल्या सदनिकांची यादी देण्यात न येणे, सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री, आयुक्त, मुंबई नगरपालिका, मुंबई, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण, वांद्रे मुंबई, जिल्हाधिकारी उपनगर वांद्रे, तहसिलदार बोरिवली आदिंना दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास झोपडीधारकांनी निवेदन देऊनही सदर विकासकावर शासनाने कोणतीच कार्यवाही न करणे, परिणामी झोपडीधारकांत शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री. अनिल भोसले,** नरेंद्र पाटील, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. संदिप बाजोरिया, धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, हेमंत टकले, किरण पावसकर, जयवंतराव जाधव, संजय दत्त, ॲड. राहुल नार्वेकर, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. आनंद ठाकूर, नारायण राणे, शरद रणपिसे, प्रकाश गजभिये, जनार्दन चांदूरकर, रामराव वडकुते, **वि.प.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात व्यापारी आणि दलाल यांनी डाळ व इतर जीवनावश्यक वस्तुंची साठेबाजी केल्यामुळे जीवनावश्यक वस्तुंच्या दरात मोठया प्रमाणात झालेली वाढ, तूरडाळ प्रतिकिलो १३६, साखर ३८ रुपये आणि तांदळाचे भाव ४५ रुपयांवर गेल्यामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडणे, भाजीपाला आणि धान्याच्या भावात सतत वाढ झाल्याने भागवायचे कसे असा सवाल सर्वसामान्यांकडून विशेषत: महिला वर्गाकडून व्यक्त होत असणे, सामान्य जनतेच्या महिन्याच्या खर्चात किमान आठशे रुपयांची वाढ झालेली असणे, सरकारकडून महागाई रोखण्यासंदर्भात कोणतीही उपाययोजना होत नसणे, चुकीची धोरणे आणि नियोजनातील अभावाचा फटका जनतेला सहन करावा लागत असणे, गेल्या दोन वर्षात डाळींचे उत्पादन कमी होत असतानाही देशातील गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणात डाळी आयात करणे आवश्यक असणे, शेंगदाण्याच्या निर्यातीवर बंधन नसल्याने शेंगदाणा आणि शेंगदाणा तेलाच्या भावात वाढ झालेली असणे, गहू आणि तांदूळ सरकारकडे लेव्हीच्या रुपाने जमा असणे, हे धान्य वेळेवर विक्रीस काढले जात नसल्याने त्याचाही परिणाम बाजारावर पडणे, हे धान्य सार्वजनिक वितरण व्यवस्थेत उशिरा विक्रीला पाठविले जाणे, तर काही वेळा शासकीय गोदामात सडून जाणे, त्यामुळे सर्वसामान्य जनतेला सोसावा लागणारा नाहक त्रास, दरवाढीची सखोल चौकशी करुन परिणामकारक उपाययोजना करावयाची आवश्यकता असतानाही राज्य शासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. संदिप बाजोरिया, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक

महत्त्वाच्या बाबीकडे **उर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"माहे जून, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास, महावितरण कंपनीने रोलॅक्स कंपनीकडून खरेदी केलेल्या लाखो मिटर पैकी ८ लाख मिटर मुंबई, पुणे आणि कल्याण या तीन झोनमध्ये बसविण्यात येणे, त्यापैकी कल्याण झोनमध्ये तीन लाख, भांडूप झोनमध्ये अडीच लाख, पुणे झोनमध्ये दीड लाख अशाप्रकारे बसविलेल्या मिटरमध्ये सर्वात जास्त सदोष मिटर असल्याची बाब लाखो ग्राहकांनी केलेल्या तक्रारीनंतर व महावितरणने केलेल्या पहाणीतून उघडकीस येणे, रोलॅक्स प्रा.लि.कंपनीकडून घेण्यात आलेल्या मिटर्समध्ये ठराविक कालावधी व युनिटच्या नोंदीनंतर दोष निर्माण होत असल्याचे उघडकीस येणे, ग्राहकांना येणारे वीजचे बिल कमी येऊ लागल्यानंतर ग्राहकांनी केलेल्या तक्रारी, तरीही ग्राहकांकडून आधीच्या काही महिन्यांची सरासरी काढून वसूल करण्यात आलेले पैसे, कल्याण झोनमध्ये सव्वालाख सदोष मिटर बदलण्यात येणे, भांडूप व पुण्यात सदोष मिटर बदलण्याची कारवाई सुरु असणे, सन २०१५ मध्ये डिजिटल मिटर खरेदीत ३ कोटी ९४ लाख इतकी रक्कम जास्त मोजल्या प्रकरणी कॅगने महावितरणला जबाबदार ठरविणे, स्वस्त मिटर खरेदी करा असा अकाऊंटस् विभागाने मटेरियल मॅनेज विभागाला दिलेल्या सल्ल्यानंतर रोलॅक्स कंपनीच्या मिटरची खरेदी करुन अंमलबजावणी केल्यामुळे महावितरणला लाखो रुपयांचे झालेले नुकसान, रोलॅक्स कंपनीने त्यांच्या सॉफ्टवेअरमध्ये दोष असल्याचे कबूल करुन नव्या सॉफ्टवेअरसह मिटर बदलून देण्याची दिलेली कबूली, तरीही महावितरणने गेल्या दोन वर्षात पुणे, कल्याण, मुंबई या तीन झोनमध्ये ८ ते १० लाख मिटर्स बसविल्यानंतर झालेल्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या रोलॅक्स कंपनी विरोधात तातडीने कारवाई न करणे तसेच रोलॅक्स कंपनीकडून मिटर खरेदी करण्याचा निर्णय घेताना कोणत्याही नियमाची अंमलबजावणी न करता सदर निर्णय घेऊन ३ ते ४ कोटी जास्त रक्कम मंजुर करणाऱ्या महावितरणच्या संबंधीत अधिकाऱ्यांविरोधातील कारवाईस होत असलेला विलंब, ग्राहकांची कोणतीही चूक नसताना त्यांना होणारा त्रास व सोसावा लागणारा आर्थिक भूर्दंड यामुळे मुंबई, पुणे व कल्याण विभागातील लाखो विद्युत ग्राहकांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(दुपारी १२.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे -

(क) मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर वि.प.स यांचा "**संग्रामपूर (जि.बुलढाणा) व तेल्हारा**

(जि.अकोला) तालुक्यातील शेतकरी सिंचनाच्या लाभापासून वंचित असल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २०५९१.

(ख) मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्रीमती विद्या चव्हाण व इतर वि.प.स यांचा **"राहूरी (जि.अहमदनगर) येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबत"** या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २१८९८.

(ग) तारांकित प्रश्न.

दोन : "लोकलेखा समितीचा अकरावा अहवाल सादर करणे."

तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — असल्यास.

(ख) म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने — असल्यास.

चार : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).

- मध्यंतर -

पाच : सन २०१६-२०१७ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला व शेवटचा दिवस.)

खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.

१. मुख्यमंत्री.

२. महसूल, मदत व पुनर्वसन कार्य, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री.

३. वित्त व नियोजन, वने मंत्री.

४. शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास व वक्फ मंत्री.

५. गृहनिर्माण मंत्री.

६. ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री.

७. आदिवासी विकास मंत्री.

८. अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक सरंक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री.

९. वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री.

१०. परिवहन, खारभूमी विकास मंत्री.

११. उद्योग, खनिकर्म मंत्री.

१२. कृषी, फलोत्पादन मंत्री.

१३. पर्यावरण मंत्री.

१४. ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री.

१५. पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री.

१६. सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री.

१७. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री.

१८. जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री.

१९. रोजगार हमी योजना, पर्यटन मंत्री.

२०. सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री.

२१. पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री.

२२. कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री.

सहा : शासकीय विधेयके -

(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६"

(१) विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १२ सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.प्रकाश गजभिये, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे.

(१) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६"**

(२) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६"**

सात : **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे,** श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड. अनिल परब, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.गोपिकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, रविंद्र फाटक, गिरीशचंद्र व्यास, सुजितसिंह ठाकूर, विनायक मेटे, श्रीमती स्मिता वाघ, डॉ.अपूर्व हिरे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"राज्यात शासकीय रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे, गुणवत्तापूर्ण रुग्णसेवा पुरविणे, याबाबत विविध योजना राबविण्यात येणे, राज्यातील कोकण व डोंगराळ प्रदेशात तसेच आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये वॉक इन इंटरव्यूद्वारे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरणे सुरू करणे, गरोदर मातांना घर ते रुग्णालय व रुग्णालय ते घर जाण्यासाठी "वात्सल्य रुग्ण वाहिका" योजना कार्यान्वित करणे, दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ पासून महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजना कार्यान्वित करण्यात येणार असणे, त्याअंतर्गत आजारांची संख्या २७६ वरुन ११०० पर्यंत आणि खर्चाची दिड लाखांची मर्यादा दोन लाखांपर्यंत वाढविण्याचे प्रस्तावित असणे, दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ पासून बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजना कार्यान्वित करण्यात येणार असणे, कॉलेज ऑफ फिजिशियन ॲड सर्जन अंतर्गत राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणे, कर्करोग टाळण्यासाठी तंबाखू सेवन नियंत्रण उपक्रम राबविण्यात येणे, राज्यभर जलयुक्त शिवार योजना राबविण्याचे शासनाचे धोरण पूर्णत्वाने फलद्रुप होणे, सद्य:स्थितीत शिवारे भरभरुन वाहत असल्याचे चित्र गावोगाव दिसून येणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

आठ : **अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

(१) **श्री.विक्रम काळे, वि.प.स.**

"राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्या १०० टक्के अनुदानावर येवूनही त्या नॉन प्लॅनमध्ये न गेल्याबाबत" या विषयावरील **श्री.विक्रम काळे व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **१६०३३** ला दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **प्रा.अनिल सोले, वि.प.स.**

"पिंपरी (ता.मुल, जि.चंद्रपूर) येथील दिक्षीत शासकिय आश्रम शाळेतील सोलर वॉटर हिटरची जोडणी करण्याबाबत" या विषयावरील

श्रीमती शोभाताई फडणवीस, माजी वि.प.स. व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **१७६८२** ला दिनांक १० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २५ जुलै, २०१६.

उत्तमसिंग चव्हाण,
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.